करोना २०२०/सुचना/आदेश क्रमांक :- 968

महाराष्ट्र शासन

महसूल व वनविभाग

जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, रायगड अलिबाग

हिराकोट तलावाजवळ, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२ २०१

दुरध्वनी क्र. ०२१४१/२२२११८ फॅक्स क्र. ०२१४१/२२७४५१, Email: tahasildargadraigad@gmail.com

**क्र.साशा/कार्या-१/ब-५/करोना विषाणू/प्रति.उपा./नेमणूक/२०२०** दि. 9 /०४/२०२०

**वाचले :-** १) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.

२) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभागाकडील अधिसूचना क्र.करोना २०२०/प्र.क्र.५८/ आरोग्य ५ दि.१३/०३/२०२०

३) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभागाकडील अधिसूचना क्र.करोना २०२०/प्र.क्र.५८/ आरोग्य ५ दि.१४/०३/२०२०

४) साथरोग अधिनियम १८९७

६) या कार्यालयाकडील आदेश करोना २०२०/सूचना/आदेश क्र.९०, क्र.साशा/कार्या-१/ब-५/ आ.व्य./करोना विषाणू/प्रतिबंधात्मक उपाययोजना/२०२० दि. २२/०३/२०२०

---

**आदेश :-**

ज्याअर्थी, शासन,सार्वजनिक आरोग्य विभागाकडील उपोद्घातांतील अ.क्र.२ कडील अधिसूचने द्वारे साथरोग अधिनियम १८९७ मधील खंड २, ३ व ४ ची अंमलबजावणी राज्यात सदर अधिसूचनेच्या प्रसिध्दी दिनांकापासून सुरु करण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, जागतिक आरोग्य संघटनेने कोरोना विषाणू संक्रमण हा जागतिक साथीचा रोग (World Pandemic) घोषित केला असून, शासन, सार्वजनिक आरोग्य विभागाकडील उपोद्धातातील अ.क्र. ३ कडील अधिसूचनेद्वारे कोरोना विषाणूचा प्रसार रोखण्याकामी **"महाराष्ट्र कोव्हिड १९ उपाययोजना नियम २०२०"** प्रसिध्द केलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यातील पोट कलम २ (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांना उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष घोषीत करण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने या कार्यालयाकडील उपोद्घातांतील आदेश क्र.६ दि.२२/०३/२०२० अन्वये जिल्हा माहिती अधिकारी रायगड यांना मा.जिल्हाधिकारी यांचे मान्यतेने दररोज सायं. ५.३० वा. प्रेस नोट प्रसिध्द करणे. न्युज पेपर मध्ये आलेल्या बातम्या/आवहाने इ.कात्रणांची संकलन करणे, इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमांमध्ये जिल्हयाच्या बातम्या देणे, प्रचार व प्रसिध्दी करणे व मा. जिल्हाधिकारी यांनी वेळोवेळी दिलेल्या सुचनांनुसार कार्यवाही करणे बाबत सुचना देण्यात आल्या आहेत. परंतु त्यानुसार आपण जबाबदारी पार पाडताना दिसून येत नाही. त्यामुळे पत्रकार व इतर अनुषंगीक प्रसार माध्यमांचे प्रतिनिधी यांच्या तक्रारी प्राप्त होत असून, त्यांना शासकीय अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा लागत असल्याने नाराजी व्यक्त होत आहे. आपल्या मार्फत प्रसार माध्यमांना माहिती देण्यात येत नाही, सदरची बाब प्रशासकीयदृष्टया योग्य नाही.

म्हणून आपणास आदेशीत करण्यात येत आहे की, जिल्हयातील विविध कार्यालये जसे की, महसूल विभाग, पोलीस विभाग व आरोग्य विभाग यांच्याशी संपर्क साधून माहिती गोळा करुन प्रेसनोट तयार करतांना दररोज सायं. ५.३० वा. जिल्हाधिकारी किंवा निवासी उपजिल्हाधिकारी रायगड यांचे मान्यतेने प्रेस नोट प्रसार माध्यमांना न चूकता देण्यात यावी या बाबत खंड पडणार नाही याची दक्षता घ्यावी.

सदर आदेशाची अंमलबजावणी न केल्यास नियमानुसार कारवाई करण्यात येईल याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

सदर आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करावी.

**प्रत :- श्री.मनोज सानप, जिल्हा माहिती अधिकारी रायगड.**

**(निधी चौधरी)**
**जिल्हाधिकारी तथा**
**अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी**
**रायगड-अलिबाग**

प्रत :- मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई यांजकडे माहितीस्तव.
प्रत :- निवासी उपजिल्हाधिकारी रायगड यांना माहितीसाठी.

DISTRICT MAGISTRATE
जिल्हा दंडाधिकारी
रायगड-अलिबाग
RAIGAD-ALIBAG

**(निधी चौधरी)**
**जिल्हाधिकारी तथा**
**अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी**
**रायगड-अलिबाग**